# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १९/०५/२०२२ (गुरूवार)

---

## वडीलाला जिवानिशी ठार मारणा—या मुलास अटक

पोलीस स्टेशन सावनेर — अंतर्गत क्वॉटर नं ४३/७ सदभावना नगर डब्लू.सी.एल. कॉलोनी पाटणसांवगी १२ किमी पुर्व. यातील फिर्यादी श्रीमती बिनिता घनश्याम तिलेकर वय ४३ वर्ष रा क्वॉटर नं ४३/७ सदभावना नगर डब्लू.सी.एल. कॉलोनी यांचे पती मृतक नामे— घनश्याम चुन्नीलाल तिलेकर वय ४७ वर्ष हे नेहमीच दारु पिवुन फिर्यादी व तिची दोन मुले १) कुंदन घनश्याम तिलेकर वय २० वर्ष २) करण घनश्याम तिलेकर वय १२ वर्ष यांना शिवीगाळ करुन मारहाण करीत होते. दिनांक १६/०५/२०२२ रोजी सांयकाळी १६/०० वा ते १६/३० वा दरम्यान फिर्यादीचे पतीने दारुचे नशेमध्ये घरातील सामान कपडे व भांडे फेकफाक केली व देवघरांची तोडफोड करुन फिर्यादीला मारहान केली. त्यामुळे फिर्यादीचा मोठा मुलगा आरोपी नामे— कुंदन तिलेकर वय २० वर्ष याने फिर्यादीचे पतीला हातबुक्याने मारहान केली. तसेच **उसाच्या काड्याने व लाकडी दांड्याने त्याच्या डोक्यावर व पाठीवर मारहान करुन त्यांना लाकडी दीवानावर जोरात आपटुन जिवानिशी ठार मारले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— श्रीमती बिनिता तिलेकर वय ४३ वर्ष रा क्वॉटर नं ४३/७ सद्भावना नगर डब्लू.सी.एल. कॉलोनी पाटणसांवगी सावनेर यांचे तक्रारीवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपीविरूध्द कलम ३०२ भा.दं.वि. अंतर्गत गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. आरोपी नामे— कुंदन घनश्याम तिलेकर वय २० वर्ष रा क्वॉटर नं ४३/७ सदभावना नगर डब्लू.सी.एल. कॉलोनी पाटणसांवगी सावनेर यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. पुढील तपास स पो नि निशांत फुलेकर पोस्टे सावनेर मो.न. ७५८८५६४३०० हे करीत आहेत.

## लोखंडी पोल चोरी

पोलीस स्टेशन कन्हान :— अंतर्गत घाटरोहणा कच्चा रोड कन्हान १४ किमी पश्चिम.यातील फिर्यादीने डब्लु.सी. एल गोंडेगाव खदान प्रतीबंधीत क्षेत्रातील घाटरोहणा कच्चा रोड येथे लाइटींग करीता ८ लोखंडाचे पोल लावुन ठेवले असता, त्यातील चार लोखंडी पोल अंदाजे किमती ५८,१८४/— रु चा माल दिनांक १३/५/२०२२ चे ०२/०० ते ०५/०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— श्री नागनाथ चरणदास खोब्रागडे वय ४५ रा गोंडेगाव खदान कन्हान यांचे रिपोर्टवरुन पोस्टे कन्हान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केलेला असून पुढील तपास पो हवा अरुण कुमार सहारे मो न ९३०९५९२५१२ हे करीत आहे.

## जबरी संभोग

**पोलीस स्टेशन बेला** :— अंतर्गत जसापुर शिवार १३ किमी पश्चिम. दिनांक 18/5/22 चे 09/00 वा. दर. यातील पिडीत फिर्यादी वय ५० वर्ष, ही बकऱ्या चारत असता, यांतील नमुद आरोपी नामे— १) सुभाष उर्फ मंथनी मारोती जुमनाके वय २६ वर्ष २), गौरव गजानन आडे वय २१ वर्ष दोन्ही रा विखनी त समुद्रपुर जि वर्धा यांनी **संगनमत करून आळीपाळीने जबरीने संभोग केला व तु घरी सांगशील तर तुला मारून टाकीन ?** अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पोस्टे बेला येथे नमुद आरोपीविरूध्द कलम 376(ड), 506 भादवी अन्वये गुन्हा नोंद केलेला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री पंकज वाघोडे पोस्टे बेला मोन 7304210724 हे करीत आहे.

## अपघातात जखमी

**पोलीस स्टेशन काटोल** :— अंतर्गत मौजा चारगाव शिवार १४ किमी पुर्व. दिनांक १८/०५/२०२२ चे ११/३० ते ११/४० वा दर. यातील यातील फिर्यादी हा आपले मोटर सायकल. क्र. एम.एच ४० सीजी ०२२१ ने नागपूर वरून काटोल येथे लग्नाकरीता पत्नी, मुलगा व मुलगी यांना बसुन काटोल कडे येत असता मागुन येणारी स्वीप्ट गाडी क्र. एम.एच. २७ डीई ०१८३ चा चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मागुन धडक मारून फिर्यादी व फिर्यादीची पत्नी मुलगा व मुलगी जख्मी होण्यास कारणीभुत झाला आहे

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरतर्फे म पो ना/भारती सुरजुसे पो.स्टे. काटोल यांचे रिपोर्टवरून पोस्टे काटोल येथे कार चालकाविरूध्द कलम २७९,३३७,३३८ भादवी सह कलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केलेला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा/ज्योती सेवतकर मो क्र ९५५२५५६३४१ हे करीत आहे.

## रेल्वने कटुन मृत्यु

**पोलीस स्टेशन काटोल** :— अंतर्गत अर्जुनगर रेल्वे लाईन 3 कि.मी. पुर्व. दिनांक 17/05/2022 चे 21/45 वा. यातील मृतक सौ. कांचन नामदेव निरडकर वय 25 वर्ष मरामायनगर काटोल हि रेल्वेने कटून अर्जुनगर रेल्वे लाईन जवळ मरण पावली आहे. रेल्वे प्रबंधक जितेद्रसिंग मध्य रेल्वे काटोल नी लेखी मेमो वरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो स्टे काटोल येथे कलम १७४ जाफौ अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर मर्गचा पुढील तपास पो. हवा प्रभुदास दलाल मो.न. 9561564852 करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**